४५/५


महाराष्ट्र शासन

आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, २ रा मजला, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ०२३.

E-mailexciseho@vsnl.net  Fax No.2266 2370 . Tel. No. Commr. 2262 02 38


वाचा :- १) शासन अधिसूचना क्रमांक एमआयएस-११०७/सीआर-३३(१)/इएक्ससी-३, दि.१० जुलै, २००७.

२) शासन अधिसूचना क्रमांक एमआयएस-११०७/सीआर-३३(२)/इएक्ससी-३, दि.१० जुलै, २००७.

३) शासन अधिसूचना क्रमांक एमआयएस-११०७/सीआर-३३(१)/इएक्ससी-३, दि.१२ नोव्हेंबर, २००७.

विषय :- परदेशातून आयात होणाऱ्या ब्रँडच्या मद्याची लेबल्स मंजूर करण्याबाबत व एफएल-१ अनुज्ञप्ती पृष्ठांकनाबाबत...

# परिपत्रक

क्रमांक :- एफएलआर- ११२००५/१२८७०/५-ब भाग-३ मुंबई, २८ मार्च, २००८

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व ३ वरील शासन अधिसूचनांनुसार परदेशातून आयात होणाऱ्या विदेशी मद्यांवरील आकारण्यात येणाऱ्या विशेष शुल्काचे दर निश्चित करण्यात आलेले असून, अ.क्र.२ वरील शासन अधिसूचेनुसार परदेशातून आयात होणाऱ्या विदेशी मद्याची लेबले मंजूर करण्याबाबत तसेच, एफएल-१ अनुज्ञप्ती वर पृष्ठांकन करण्याबाबत कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

२. सदर अधिसूचनांमधील तरतुदीनुसार जे एफएल-१ अनुज्ञप्तीधारक सीमाशुल्क विभागाच्या अथवा कस्टम बंदिस्त वखारीतून विदेशी मद्य बाहेर काढू इच्छित असतील त्यांनी मा.आयुक्तांकडे त्यांना प्राधिकृत करण्याकरीता अर्ज करणे आवश्यक आहे. त्याकरिता रु.२,५०,०००/- वार्षिक शुल्क विहीत करण्यात आले असून, एफएल-१ अनुज्ञप्तीवर आवश्यक ती नोंद घेतल्यावर घटकाने विदेशी मद्याची लेबल्स मंजूरीबाबतचे विहीत शुल्क भरुन लेबल्स मंजूर करुन घेणे आवश्यक आहे.

३. आयुक्तालयास एफएल-१ अनुज्ञप्ती पृष्ठांकनासाठी सादर करण्यापूर्वी सदर अनुज्ञप्तीचे नुतणीकरण त्या वर्षाकरिता करण्यात आलेले असणे अनिवार्य आहे.

४. परदेशातून मद्य आयात करु इच्छित असणाऱ्या प्रत्येक एफएल-१ अनुज्ञप्तीधारकाने अनुज्ञप्तीवर पृष्ठांकन करुन घेणे बंधनकारक आहे. सदर ब्रँडच्या लेबल्सची स्वतंत्र मंजूरी घेणे आवश्यक राहील. तसेच, ज्या लेबल्सवर आक्षेपार्ह चित्रे / मजकूर असतील अशा लेबल्सना मंजूरी दिली जाणार नाही.

५. एका एफएल-१ अनुज्ञप्तीधारकास मंजूर असलेल्या परदेशातून आयात केलेल्या लेबल्सचे मद्य दुसऱ्या एफएल-१ अनुज्ञप्तीधारकास विकता येणार नाही.

६. नोंदणीकृत विदेशी मद्याची आयात त्यावरील विशेष / वाहतूक शुल्काचा भरणा करुन एफएल-१ अनुज्ञप्तीमध्ये केल्यावर नोंदणीचा विधीग्राह्य कालावधी संपल्यावर देखील एफएल-१ अनुज्ञप्तीमध्ये शिल्लक असलेला मद्य साठा संपुष्टात येईपर्यंत कधीही विकता येवू शकेल.

७. मंजूर असलेल्या ब्रँडच्या / लेबल्सचे मद्य एफएल-१ अनुज्ञप्तीमध्ये त्याच वित्तीय वर्षाच्या विधीग्राह्य कालावधीत पुन्हा आयात करावयाचे असेल व मंजूर असलेल्या लेबल्सवरील मजकूरात, बाटलीच्या क्षमतेव्यतिरिक्त कोणताही बदल होणार नसेल तर पुन्हा लेबल मंजूरी शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. तथापि, सदर मद्याच्या आयातीकरिता आवश्यक असलेले इतर शुल्क भरणे अनिवार्य राहील.

( आय. एस. चहल )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

O/C

प्रति,

१. संबंधित एफएल-१ अनुज्ञप्तीधारक
व त्यावरील प्रभारी अधिकारी
( मार्फत- संबंधित अधीक्षक )

29/8/06

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

१. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
२. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
३. सर्व राजपत्रित अधिकारी आयुक्तालय
४. सर्व कार्यासन अधिकारी आयुतक्तालय
५. अभिलेख शाखा ( ५ प्रती )

D:\Sajay Mohite\Format\Circular FL1